NAP AMC - 58

**उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालय**

रा.भा.क्र.२७ /एनएपी-३४/बडनेरा/२०१८ - २०१९

अर्जदार :सुभाष नानकराम तलडा, रा. बाबा हरदासराम सोसायटी, अमरावती

**अकृषक आकारणी सनद**

वाचा : महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक ५ जानेवारी २०१७ सन -२०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ यातील सुधारणा अध्यादेश.

(पारीत दिनांक - ६ /१२/ २०१८)

अर्जदार :सुभाष नानकराम तलडा, सुभाष नानकराम तलडा, रा. बाबा हरदासराम सोसायटी, अमरावती यांचे अर्जानुसार मौजा बडनेरा, ता. जि. अमरावती येथील शेत भूमापन क्रमांक १८, भूमापन विभागाचा उपविभाग २-ब, भोगवटदार वर्ग - १, चे एकुण क्षेत्र ०.८० हे.आर. शेतजमीन अर्जदार यांचे मालकीची आहे. त्यांनी ०.८० हे.आर. शेतजमीन औद्योगिक प्रयोजना करिता अकृषक आकारणी निश्चीत करण्याबाबत अर्ज सादर केल्यावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले.

अर्जदार यांनी अर्जासोबत गावनमुना ७/१२, महानगरपालीका अमरावती यांचे पत्र क्रमांक अमनपा / ससंनर/३०/२०१८ दिनांक ५.१२.२०१८ नुसार प्राप्त अहवाल सादर केल्यावरुन त्याची पडताळणी करुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले व मालकी हक्काबाबत शहानिशा करण्यात आली. अकृषक आकारणी करीता अर्जित शेतजमीन अर्जदार यांच्या मालकीची कब्जातील व भोगवटदार वर्ग - १ असल्याची खात्री करुन घेण्यात आली. सदर जमीनीबाबत कोणत्याही न्यायालयात प्रकरण सुरु नाही. व सदर जमीनीवर कोणताही भार नाही.

सदर प्रकरण दिनांक ५.१२.२०१८ रोजी पंजीबध्द करण्यात आले.

प्रकरणांत अर्जदार यांच्या अर्जान्वये अकृषक आकारणी सनद पारीत करण्यापूर्वी अर्जदार यांनी प्रस्तावित शेतजमीन औद्योगिक कारणासाठी विकसीत करण्याकरीता प्रादेशिक परियोजनेनुसार सहायक संचालक नगररचना महानगरपालीका अमरावती, यांचे अभिप्राय पत्र क्रमांक अमनपा / ससंनर/३०/२०१८ दिनांक ५.१२.२०१८ नुसार विकास करण्याकरीता नियोजनात्मक अभिन्यास दाखल केले. सहायक संचालक नगर रचना अमरावती यांनी त्यांच्या पत्रात नमुद अटीवर शेतजमीन विकास करण्याकरीता अभिन्यासास अंतिम मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूर अभिन्यासान्वये अर्जदार यांना अकृषक आकारणी खालीलप्रमाणे मंजूर करुन देण्यात येत आहे. तसेच सहायक संचालक नगररचना यांनी निर्देशित केल्याप्रमाणे अटी शर्ती सदर अकृषक आकारणी सनद आदेशात नमुद करण्यात येत आहे.

सदर जमीनीचा महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २६/१०/१९७१ मध्ये प्रसिध्द झाल्याप्रमाणे वर्ग-१ च्या गावात अंतर्भाव होतो व महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दिनांक २३ ऑक्टोबर २००७ नुसार औद्योगिक प्रयोजनासाठी अकृषक आकार रु. ०.१४ रु. प्रती चौ.मि. दिनांक ०१/०८/२००८ पासून लागू करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अर्जीत जमीनीचा तपशिल व अकृषक आकारणी पुढील प्रमाणे होईल.

| अ.क्र | जमीन वापराचा तपशिल | एकूण क्षेत्रफळ चौ.मिटर | अकृषक प्रमाणे दर प्रती चौ.मि. पैसे | अकृषक आकारणी रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | *Recreational open Space (Proposed)* | 832.20 | 0.84 | 699.05 |
| 2 | *Internal Road area* | 1762.89 | 0.84 | 1480.82 |
| 3 | *Area Under Layout plots* | 5404.91 | 0.84 | 4540.12 |
| | *Area Under Conversion* | **8000.00** | | |

खुली जागा व रस्त्याखालील जागा सार्वजनीक कामाकरिता वापरावयाची असल्यास आकारणीत खालील प्रमाणे सुट देण्यात येत आहे.

| अ.क्र | जमीन वापराचा तपशिल | एकूण क्षेत्रफळ चौ.मिटर | अकृषक प्रमाणे दर प्रती चौ.मि. पैसे | अकृषक आकारणी रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | *Recreational open Space (Proposed)* | 832.20 | 0.84 | 699.05 |
| 2 | *Internal Road area* | 1762.89 | 084 | 1480.82 |

**<u>सहायक संचालक नगर रचना महानगरपालिका अमरावती यांच्या कार्यालयाव्दारे निर्देशित अटी व शर्ती</u>**

१. नियोजन प्राधिका-याचे पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही भुखंडाचे भविष्यात विभाजन करता कामा नये.

२. अभिन्यासातील खुली जागा / बगीचा / खेळाचे मैदान / दुकान/ शाळा / बालवाडी इत्यादी करीता प्रस्तावित केलेल्या जागे व्यतीरिक्त संपूर्ण औद्योगिक अभिन्यासातील भुखंड फक्त औद्योगिक

..2/-

(Service Industries) वापराकरीताच अनुज्ञेय राहतील.

३. सार्वजनिक उपयोगाकरिता प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा / भुखंडाचा उपयोग / वापर त्याच कामाकरीता करण्यात यावा.

४. अभिन्यासातील रस्ते व सार्वजनिक खुली जागा विकसीत केल्यानंतर देखरेखीकरीता विनामुल्य महानगरपालिका अमरावती यांचेकडे हस्तांतरीत करावे लागेल.

५. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत आवश्यक ते विकास शुल्क भरणा करुन महानगरपालिकाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

६. विषयांकित जागेतून उच्च दाबाची विद्युत वाहिनी किंवा दुरध्वनीवाहिनी जात असल्यास ती रस्त्याच्या कडेला स्थानांतरीत केल्याशिवाय भुखंडाची विक्री किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

७. इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करावे.

८. अभिन्यासातील विक्री करण्यात आलेल्या प्रत्येक भुखंडाच्या विक्रीची माहिती (खरेदीखताची प्रत) या विभागात नोंदविणे आपल्याला बंधनकारक राहील.

९. अभिन्यासातील भुखंडावर बांधकाम करतांना छतावरील पावसाचे पाणी संकलन त्याचे जमीनीमध्ये पुनर्भरण करण्याच्या प्रकल्पाचे बांधकाम करणे महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार बंधनकारक राहील.

१० अभिन्यासातील खुल्या जागेवर अभिन्यासातील सर्व भुखंड धारकांचा हक्क राहील.

११. सदर्हू अभिन्यासातील सर्व प्राथमिक विकास कामे करुन द्यावी लागतील. तसेच पथदिव्याचे विद्युत पुरवठयाकरीता स्वतंत्र मिटर व पथदिवे चालू बंद करण्याकरीता स्विचेस याची व्यवस्था करावी. पथदिवे चालु ठेवुन त्याचे विज वापराची देयके भरणे जमीन मालकाने / विकासकर्ते यांची जबाबदारी राहील. सदर्हू प्राथमिक विकास कामाचे पुर्णत्वानंतर ३ वर्षापर्यंत देखभाल जमीन मालक / विकासक यांना करावी लागेल त्याबाबत म.न.पा. चे शहर अभियंता विभागाचे निर्देशानुसार पुर्तता करुन ३ वर्षानंतर सदर्हू विकास कामे सुस्थितीत महानगरपालीकास हस्तांतरीत करावी लागतील.

१२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्र. आरबीडी-१०८१/८७१/रस्ते-७/दिनांक ९. मार्च २००१ मध्ये नमुद केलेल्या पथकिनारवर्ती नियमात व त्या संबधात वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णय परिपत्रकामध्ये नमुद केल्यानुसार इमारत रेषा व नियंत्रण रेषा यांची अंतरे विहीत करण्यात आलेली आहे.त्यानुसार व तसेच भविष्य काळात उक्त रस्त्याचे वर्गीकरणात बदल झाल्यास अशा वर्गीकृत रस्त्यापासून बांधकाम / नियंत्रण रेषेसंबधाने सोडावयाच्या सन्मुख अंतराप्रमाणे सदर भुखंडामध्ये बांधकाम /विकास नियोजित करतांना नियोजन करुन त्याचे पालन करणे अर्जदार जमिनमालक/विकासकर्त्यांसह सर्व संबधितांवर बंधनकारक राहील.

SUB-DIVISIONAL OFFICER AMRAVATI

१३. अर्जदार जमिनमालक/ विकासकर्त्यांनी सदर जागेतील वृक्षांचे संरक्षण करणे तसेच अभिन्यासाचे क्षेत्रफळानुसार प्रति हेक्टर्स २५ प्रमाणे झाडे लावून ट्री गार्ड लावणे आवश्यक व बंधनकारक राहील. सदर अभिन्यासाचे जमिनीच्या सिमेबाबत तसेच भुखंडाचे क्षेत्रफळाबाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी अभिन्यास मालकाची राहील व त्याची नुकसानभरपाई करुन द्यावी लागेल.

१४. महाराष्ट्र जमिन महसूल नियम,१९६९(जमिनीच्या वापरातील बदल व अकृषक कर आकारणी) च्या नियम ४ च्या अटींचे पालन करणे,अर्जदार/विकासकर्ते/जमिनमालक यांच्यावर बंधनकारक आहे.

१५. प्रकरणात अर्जदार/ जमीनमालक / विकासकर्त्यांनी दाखल केलेल्या सिमांकीत मोजनी नकाशात दर्शविलेल्या पोटहिस्सा / वहीवाट हद्दी ग्राहय धरुन मंजूरीची शिफारस करण्यात येत आहे. जागेवरील सिमांकनामुळे जागेच्या लगतच्या जमीन धारकाचे हितसंबध बाधीत होत असल्यास त्याबाबत कोणताही वाद उद्भवल्यास व अशा वादामध्ये तथ्य आढळल्यास सदरची शिफारस आपोआप रद्दबातल समजन्यात येईल.

१६. सदरहू प्रकरणांत अभिन्यास नकाशांना शिफारस करतांना अर्जदार जमीन मालक विकासकर्त्यांनी प्रकरणांसोबत दाखल केलेली मालकी हक्काची कागदपत्रे व मोजनी नकाशा इत्यादी कागदपत्रे ग्राहय धरण्यात आली आहे. सदर कागदपत्रे बोगस व दिशाभूल करणारी आढळल्यास व तसेच उक्त अट क्रमाक १५ मध्ये नमुद केल्यानुसार तथ्य आढळल्यास सदर शिफारस तात्काळ रद्दबातल समजण्यात येईल. त्याचबरोबर भविष्य काळात या अनुषंगाने कोणतीही तक्रार वा न्यायलयीन वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी जमीन मालक / विकासकर्त्यांची राहील व तशा तक्रारीस वा न्यायालयीन वादास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१७. प्रकरणी औद्योगिक विभागाचे प्रदुषन नियंत्रण मंडळाचे तसेच सर्व संबधीत विभागाचे नाहरकत घेण्यात यावे.

१. अर्जित शेत जमीन मधील निवासी वापराकरीता **एकुण क्षेत्र ५४०४.९१ चौ.मि** जागेवर अकृषिक कर रु. ४५४०.१२ **(पूर्णांकात रु.४५४१/-)** कायम करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य राजपत्र दिनांक २३ ऑक्टोबर २००८ मध्ये प्रसिध्द झाल्यानुसार आकारण्यात येत आहे. त्यानंतर जी सुधारीत आकारणी शासन घोषीत करील, त्याप्रमाणे भरण्यास अर्जदार बंधनकारक राहील.

२. वरील पैकी कोणत्याही अटींचे व शर्तीचे उल्लंघन झाल्यास उक्त बाबतीत जे नियम अस्तित्वात असतील त्या प्रमाणे उपविभागीय अधिकारी, अमरावती जो दंड किंवा आदेश देतील ते अर्जदारास पालन करणे बंधनकारक राहील.

३. मंजूर अभिन्यासाप्रमाणे अर्जदारास सन **२०१८-१९** पासून वार्षीक अकृषक कर रुपये ४५४१/- रुपांतरीत कर रु. **३१७८७/-** असे एकुण रक्कम **३६३२८/-** रु.**(अक्षरी रुपये छत्तीस हजार तिनशे अठ्ठावीस रुपये फक्त)** चा भरणा करावा लागेल.

४. सदर प्रकरणी अर्जदार यांनी दाखल केलेल्या दस्तऐवजांच्या आधारे अकृषक आकारणी करण्यात येत आहे. भविष्यात सदर प्रकरणी जागेच्या मालकी हक्काबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण वा कोणत्याही प्रकारचा वाद उद्‌भवल्याचे निदर्शनात आल्यास व त्यात तथ्य आढळून आल्यास अर्जदार / विकासकर्ते / जमीन मालक सर्वस्वी जबाबदार राहतील. व सदर आदेश आपोआप रद्दबातल ठरेल.

सदर प्रकरणी दिनांक ५.१२.२०१८ रोजीच्या अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे तसेच सहायक संचालक नगर रचना महानगरपालिका अमरावती, यांचे अभिप्राय पत्र क्रमांक अमनपा / ससंनर/३०/२०१८ दिनांक ५.१२.२०१८ अन्वये मंजूर नियोजन अभिन्यासाप्रमाणे **महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक ५. जानेवारी २०१७ सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ यातील सुधारणा अध्यादेश** मधील ४२ ब मधील तरतुदीअन्वये वरीलप्रमाणे अकृषक आकारणी निश्चीत करण्यात येत आहे. अर्जदार यांनी अकृषक आकारणी कर भरणा करावा व जमीन विकासाच्या दृष्टीने सहायक संचालक नगर रचना अमरावती यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करावे.

सही/-
उपविभागीय अधिकारी
अमरावती.

<u>प्रतिलीपी</u> -

१. मा.जिल्हाधिकारी अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. तहसिलदार, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
३. उपअधिक्षक, भुमी अभिलेख अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
४. सहायक संचालक नगर रचना, महानगरपालिका अमरावती.
५. तलाठी / मंडळ अधिकारी मौजा बडनेरा, ता. अमरावती यांना कार्यवाहीस्तव रवाना.
६. अर्जदार सुभाष नानकराम तलडा, रा. बाबा हरदासराम सोसायटी, अमरावती

SUB-DIVISIONAL OFFICER AMRAVATI

उपविभागीय अधिकारी
अमरावती.

NAP AMC 43

# उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालय

रा.भा.क्र. १२ /एनएपी-३४/बडनेरा/२०१८ - २०१९

अर्जदार : सुभाष नानकराम तलडा, रा बाबा हरदासराम सोसायटी, अमरावती, ता.जि.अमरावती

## अकृषक आकारणी सनद

वाचा : महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक ५, जानेवारी २०१७ सन -२०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ यातील सुधारणा अध्यादेश.

(पारीत दिनांक - 19 /०९/ २०१८)

अर्जदार : सुभाष नानकराम तलडा, रा बाबा हरदासराम सोसायटी, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी मौजा बडनेरा, ता. जि. अमरावती येथील शेत सर्वे नं. १३/२-अ भोगवटदार वर्ग - १, एकुण क्षेत्रफळ ०.८१ हे.आर. आकार २.३५/- ही शेतजमीन अर्जदार यांच्या मालकीची आहे त्यांच्या मालकीची ०.८१ शेतजमीन निवासी प्रयोजनाकरिता अकृषक आकारणी निश्चीत करण्याबाबत अर्ज सादर केल्यावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले.

अर्जदार यांनी अर्जासोबत गावनमुना ७/१२, आधार कार्ड ओळखपत्र, महानगरपालीका अमरावती यांचे पत्र क्रमांक अमनपा / ससंनर/ २४/२०१८ दिनांक १०.९.२०१८ नुसार प्राप्त अहवाल सादर केल्यावरुन त्याची पडताळणी करुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले व मालकी हक्काबाबत शहानिशा करण्यात आली. अकृषक आकारणी करीता अर्जित शेतजमीन अर्जदार यांच्या मालकीची कब्जातील व भोगवटदार वर्ग - १ असल्याची खात्री करुन घेण्यात आली. सदर जमीनीबाबत कोणत्याही न्यायालयात प्रकरण सुरु नाही. व सदर जमीनीवर कोणताही भार नाही.

सदर प्रकरण दिनांक १७.९.२०१८ रोजी पंजीबध्द करण्यात आले.

प्रकरणांत अर्जदार यांच्या अर्जान्वये अकृषक आकारणी सनद पारीत करण्यापूर्वी अर्जदार यांनी प्रस्तावित शेतजमीन निवासी कारणासाठी विकसीत करण्याकरीता प्रादेशिक परियोजनेनुसार सहायक संचालक नगररचना महानगरपालीका अमरावती, यांचे अभिप्राय पत्र क्रमांक अमनपा / ससंनर/२४/२०१८ दिनांक १०.९.२०१८ नुसार विकास करण्याकरीता नियोजनात्मक अभिन्यास दाखल केले. सहायक संचालक नगर रचना अमरावती यांनी त्यांच्या पत्रात नमुद अटींवर शेतजमीन विकास करण्याकरीता अभिन्यासास अंतिम मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूर अभिन्यासान्वये अर्जदार यांना अकृषक आकारणी खालीलप्रमाणे मंजूर करुन देण्यात येत आहे. तसेच सहायक संचालक नगररचना यांनी निर्देशित केल्याप्रमाणे अटी शर्ती सदर अकृषक आकारणी सनद आदेशात नमुद करण्यात येत आहे.

सदर जमीनीचा महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २६/१०/१९७१ मध्ये प्रसिध्द झाल्याप्रमाणे वर्ग-१ च्या गावात अंतर्भाव होतो व महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दिनांक २३ ऑक्टोंबर २००७ नुसार निवासी प्रयोजनासाठी अकृषक आकार रु. ०.१५ रु. प्रती चौ.मि. दिनांक ०१/०८/२००८ पासून लागू करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अर्जीत जमीनीचा तपशिल व अकृषक आकारणी पुढील प्रमाणे होईल.

| अ.क्र | जमीन वापराचा तपशिल | एकूण क्षेत्रफळ चौ.मिटर | अकृषक प्रमाणे दर प्रती चौ.मि. पैसे | अकृषक आकारणी रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | *Area under Residential Plots* | 4490.00 | 0.90 | 4041.00 |
| 2 | *Area under Open Space* | 816.40 | 0.90 | 734.40 |
| 3 | *Area under Roads* | 2793.60 | 0.90 | 2514.24 |
| | **एकुण रुपांतरीत क्षेत्र** | 8100.00 | - | 7289.64 |

SUB-DIVISIONAL OFFICER * AMRAVATI *

खुली जागा व रस्त्याखालील जागा सार्वजनीक कामाकरिता वापरावयाची असल्यास आकारणीत खालील प्रमाणे सुट देण्यात येत आहे.

| अ.क्र | जमीन वापराचा तपशिल | एकूण क्षेत्रफळ चौ.मिटर | अकृषक प्रमाणे दर प्रती चौ.मि. पैसे | अकृषक आकारणी रुपये |
|---|---|---|---|---|
| 2 | *Area under Open Space* | 816.40 | 0.90 | 734.40 |
| 3 | *Area under Roads* | 2793.60 | 0.90 | 2514.24 |

**सहायक संचालक नगर रचना महानगरपालिका अमरावती यांच्या कार्यालयाव्दारे निर्देशित अटी व शर्ती**

१. नियोजन प्राधिका-याचे पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही भुखंडाचे भविष्यात विभाजन करता कामा नये.

२. अभिन्यासातील खुली जागा / बगीचा / खेळाचे मैदान / दुकान/ शाळा / बालवाडी इत्यादी करीता प्रस्तावित केलेल्या जागे व्यतीरिक्त संपूर्ण निवासी अभिन्यासातील भुखंड फक्त निवासी वापराकरीताच अनुज्ञेय राहतील.

३. सार्वजनिक उपयोगाकरिता प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा / भुखंडाचा उपयोग / वापर त्याच कामाकरीता करण्यात यावा

४. अभिन्यासातील रस्ते व सार्वजनिक खुली जागा विकसीत केल्यानंतर देखरेखीकरीता नियमाप्रमाणे महानगरपालिका अमरावती यांचेकडे हस्तांतरीत करावे लागेल.

५. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत आवश्यक ते विकास शुल्क भरणा करुन महानगरपालिकाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

६. विषयांकित जागेतून उच्च दाबाची विद्युत वाहिनी किंवा दुरध्वनीवाहिनी जात असल्यास ती रस्त्याच्या कडेला स्थानांतरीत केल्याशिवाय मुखंडाची विक्री किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

७. इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करावे.

८. अभिन्यासातील विक्री करण्यात आलेल्या प्रत्येक भुखंडाच्या विक्रीची माहिती (खरेदीखताची प्रत) या विभागात नोंदविणे आपल्याला बंधनकारक राहील.

९. अभिन्यासातील भुखंडावर बांधकाम करतांना छतावरील पावसाचे पाणी संकलन त्याचे जमीनीमध्ये पूनर्भरण करण्याच्या प्रकल्पाचे बांधकाम करणे महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार बंधनकारक राहील.

१० अभिन्यासातील खुल्या जागेवर अभिन्यासातील सर्व भुखंड धारकांचा हक्क राहील.

११. सदर्हू अभिन्यासातील सर्व प्राथमिक विकास कामे करुन द्यावी लागतील. तसेच पथदिव्याचे विद्युत पुरवठ्याकरीता स्वतंत्र मिटर व पथदिवे चालू बंद करण्याकरीता स्विचेस याची व्यवस्था करावी. पथदिवे चालू ठेवुन त्याचे विज वापराची देयके भरणे जमीन मालकाने / विकासकर्ते यांची जबाबदारी राहील. सदर्हू प्राथमिक विकास कामाचे पुर्णत्वानंतर ३ वर्षापर्यंत देखभाल जमीन मालक / विकासक यांना करावी लागेल त्याबाबत म.न.पा. चे शहर अभियंता विभागाचे निर्देशानुसार पुर्तता करुन ३ वर्षानंतर सदर्हू विकास कामे सुस्थितीत महानगरपालीकास हस्तांतरीत करावी लागतील.

१२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्र. आरबीडी-१०८१/८७१/रस्ते-७/दिनांक ९. मार्च २००१ मध्ये नमुद केलेल्या पथकिनारवर्ती नियमात व त्या संबधात वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णय परिपत्रकामध्ये नमुद केल्यानुसार इमारत रेषा व नियंत्रण रेषा यांची अंतरे विहीत करण्यात आलेली आहे.त्यानुसार व तसेच भविष्य काळात उक्त रस्त्याचे वर्गीकरणात बदल झाल्यास अशा वर्गीकृत रस्त्यापासून बांधकाम / नियंत्रण रेषेसंबधाने सोडावयाच्या सन्मुख अंतराप्रमाणे सदर भुखंडामध्ये बांधकाम /विकास नियोजित करतांना नियोजन करुन त्याचे पालन करणे अर्जदार जमिनमालक/विकासकर्त्यांसह सर्व संबधितांवर बंधनकारक राहील.

SUB-DIVISIONAL OFFICER AMRAVATI

१३. अर्जदार जमिनमालक/ विकासकर्त्यांनी सदर जागेतील वृक्षांचे संरक्षण करणे तसेच अभिन्यासाचे क्षेत्रफळानुसार प्रति हेक्टर्स २५ प्रमाणे झाडे लावुन ट्री गार्ड लावणे आवश्यक व बंधनकारक राहील.

१४. महाराष्ट्र जमिन महसुल नियम,१९६९(जमिनीच्या वापरातील बदल व अकृषक कर आकारणी) च्या नियम ४ च्या अटींचे पालन करणे,अर्जदार/विकासकर्ते/जमिनमालक यांच्यावर बंधनकारक आहे.

१५. प्रकरणांत अर्जदार जमिनमालक / विकासकर्त्यांनी दाखल केलेल्या सिमांकित मोजणी नकाशात दर्शविलेला पोटहिस्सा / वहिवाट ग्राहय धरुन मंजूरीची शिफारस करण्यात येत आहे. जागेवरील सिमांकनामुळे जागेच्या लगतच्या जमिनधारकाचे हितसंबध बाधित होत असल्यास व त्याबाबत कोणताही वाद उद्भवल्यास व अशा वादामध्ये तथ्य आढळल्यास सदरची शिफारस आपोआप रद्द समजन्यात येईल.

१६. सदरहू प्रकरणांत अभिन्यास नकाशांना शिफारस करतांना अर्जदार जमिनमालक/ विकासकर्त्यांनी प्रकरणासोबत दाखल केलेली मालकी हक्काची कागदपत्रे व सिमांकीत मोजनी नकाशा इत्यादी कागदपत्रे ग्राहय धरण्यात आली आहेत.सदर कागदपत्रे बोगस व दिशाभूल करणारे आढळल्यास तसेच उक्त अट क्र. १४ मध्ये नमुद केल्यानुसार तथ्य आढळल्यास सदर शिफारस तात्काळ रद्द समजन्यात येईल. त्याचबरोबर भविष्य काळात या अनुषंगाने कोणतीही तक्रार वा न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार जमिनमालक / विकासकर्त्याची राहील व तशा तक्रारीस या न्यायालयीन वादास हे कार्यालय, जबाबदार राहणार नाही.

१७. वरीलपैकी कोणतीही अट आवेदकास मान्य नसल्यास अर्जदार यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये मौजा बडनेरा, ता. जि. अमरावती येथील शेत सर्वे नं. १३/२-अ भोगवटदार वर्ग - १, एकुण क्षेत्रफळ ०.८१ हे.आर. आकार २.३५/- ही शेतजमीन निवासी प्रयोजनाकरिता अकृषक करण्याचा हा आदेश रद्द समजण्यात येईल.

१५. अर्जित शेत जमीन मधील निवासी वापराकरीता **एकुण क्षेत्र ४४९०.०० चौ.मि.** जागेवर अकृषक कर **रु. ४०४१.००/-** कायम करण्यात येत आहे.महाराष्ट्र राज्य राजपत्र दिनांक २३ ऑक्टोबर २००७ मध्ये प्रसिध्द झाल्यानुसार आकारण्यात येत आहे. त्यानंतर -जी सुधारीत आकारणी शासन घोषीत करील, त्याप्रमाणे भरण्यास अर्जदार बंधनकारक राहील.

१६. वरील पैकी कोणत्याही अटीचे व शर्तीचे उल्लंघन झाल्यास उक्त बाबतीत जे नियम अस्तित्वात असतील त्या प्रमाणे उपविभागीय अधिकारी, अमरावती जो दंड किंवा आदेश देतील ते आवेदकास

...३/-

NAP AMC'45



पालन करणे बंधनकारक राहील.

१७. मंजूर अभिन्यासाप्रमाणे अर्जदारास सन २०१८-१९ पासून वार्षीक अकृषक कर रुपये ४७४१.००/- रुपांतरीत कर रु. २८२८७/- असे एकुण रक्कम ३३२३८/- रु. चा भरणा करावा लागेल.

सदर प्रकरणी दिनांक १७.९.२०१८ रोजीच्या अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे तसेच सहायक संचालक नगर रचना महानगरपालिका अमरावती, यांचे अभिप्राय पत्र क्रमांक अमनपा / ससंनर/२५/२०१८ दिनांक १०.९.२०१८ अन्वये मंजूर नियोजन अभिन्यासाप्रमाणे **महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक ५. जानेवारी २०१७ सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ यातील सुधारणा अध्यादेश** मधील ४२ ब मधील तरतुदीअन्वये वरीलप्रमाणे अकृषक आकारणी निश्चीत करण्यात येत आहे. अर्जदार यांनी अकृषक आकारणी कर भरणा करावा व जमीन विकासाच्या दृष्टीने सहायक संचालक नगर रचना अमरावती यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करावे.

स्वा/-
**उपविभागीय अधिकारी**
**अमरावती.**

**<u>प्रतिलीपी</u> -**

१. मा.जिल्हाधिकारी अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. तहसिलदार, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
३. उपअधिक्षक, भुमी अभिलेख अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
४. सहायक संचालक नगर रचना, महानगरपालिका अमरावती.
५. तलाठी / मंडळ अधिकारी मौजा बडनेरा, ता. अमरावती यांना कार्यवाहीस्तव रवाना.
६. सुभाष नानकराम तलडा, रा बाबा हरदासराम सोसायटी, अमरावती, ता.जि.अमरावती

**उपविभागीय अधिकारी**
**अमरावती.**

SUB-DIVISIONAL OFFICER * AMRAVATI *